**विशेष दरखास्त क्र. ०३/२०२६ मध्ये निशाणी ०९ खाली आदेश**

( लक्ष्मी पेट्रोलियम वि. आर्यन शुगर्स लि.,खामगांव )

[CNR No.MHSO120000282026]

प्रस्तुत अर्ज धनको याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१, नियम ४६ नुसार फेडरल बॅक, बार्शी यांनी ऋणको यांच्या खात्यातील रक्कम न्यायालयाच्या परवानगीशिवाय ऋणको यांना देवू देऊ नये असा प्रतिबंधात्मक आदेशासाठी दाखल केला आहे.

२) धनको याचे असे कथन आहे की, विशेष दिवाणी दावा क्र. १०३/२०१६ मधील हुकूमनाम्याच्या आदेशानुसार रक्कम रुपये २१,७७,१५९.७२ पैसे ऋणको याच्याकडून वसुल करण्याचे आदेश पारित झाले आहे. सदरची रक्कम ही या अर्जानुसार रुपये ५७,८१,३८४.७२ इतकी व्याजासहीत थकीत आहे. धनको यांच्या माहितीनुसार, फेडरल बॅंक लि., शाखा बार्शी सुत मिल समोर, सुभाष नगर, बार्शी या बॅंकेमध्ये ऋणको यांनी कायम ठेवी स्वरुपात अंदाजे रुपये १,००,००,०००/– जमा आहेत. सदरची रक्कम ही आर्यन शुगर्स, खामगांव यांच्या नांवे जमा आहे. ऋणको हुकूमनाम्यामधील आदेशानुसार देय रक्कम धनको यांना देण्याचे टाळत आहे. सदर दरखास्तीची अंमलबजाणीसाठी फेडरल बॅंक येथील जमा रक्कम जप्त करणे आवश्यक आहे. अन्यथा धनको यांस हुकूमनाम्याचा फायदा मिळण्यापासून वंचित रहावे लागणार आहे. धनको याचे पुढे असे कथन आहे की, दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१, नियम ४६अ नुसार फेडरल बॅंक यांनी ऋणको यांना देय असलेली रक्कम न्यायालयात जमा करणेसंबंधी नोटीस अथवा कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी अशी विनंती केली आहे. तरी सदरचा अर्ज मंजूर करण्याची धनको यांनी विनंती केली आहे.

३) प्रस्तुतच्या अर्जावर फेडरल बॅक,बार्शी यांना दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २१ नियम ४६अ नुसार नोटीस काढण्यात आले होते परंतु सदरची नोटीस बजावूनही संबंधित बॅक यांनी सदर अर्जावर म्हणणे दिले नाही. सबब सदरचा अर्ज बॅकेविरुध्द विना म्हणणे पुढे चालविण्यात आले.

४) धनको तर्फे अर्ज वाचला. अर्जाचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, विशेष दिवाणी दावा क्र.१०३/२०१६ मधील

हुकूमनाम्याच्या आदेशानुसार रक्कम रुपये २१,७७,१५९.७२ पैसे ऋणको याच्याकडून धनको यांना येणे बाकी आहे. या अर्जानुसार रुपये ५७,८१,३८४.७२ इतकी व्याजासहीत थकीत आहे. धनको यांच्या अर्जानुसार फेडरल बँक लि. येथे कायम ठेवी स्वरुपात अंदाजे रुपये १,००,००,०००/– ऋणको यांच्या नावावर जमा आहे. प्रस्तुतच्या अर्जावरील आदेशानुसार फेडरल बँक यांना दिनांक १८/०४/२०२६ रोजी न्यायालयासमोर हजर राहून त्यांच्या ताब्यातील रक्कम १,००,००,०००/– धनको यांना का देण्यात येवू नये याबाबत नोटीस काढण्यात आली होती परंतु त्यांनी सदर नोटीसीची बजावणी होवूनही त्यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही. फेडरल बँक यांना पुरेशी संधी देवूनही प्रकरणात हजर राहून पुढील कार्यवाही केली नाही. विशेष दिवाणी दावा क्र. १०३/२०१६ मधील हुकूमनाम्याच्या अनुषंगाने सदर दरखास्तीच्या अंमलबजावणीसाठी फेडरल बँक लि. यांच्याकडील कायम ठेव रक्कम रुपये १,००,००,०००/– संबंधी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या आदेश XXI नियम ४६ मधील तरतुदीनुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. धनको यांचा (नि.०९) अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. फेडरल बँक लि., शाखा बार्शी सुत मिलसमोर, सुभाष नगर, बार्शी यांना आदेशित करण्यात येते की, आपल्या बॅकेत ऋणको (आर्यन शुगर्स लि., खामगांव) यांच्या नांवे कायम ठेवी स्वरुपात अंदाजे रुपये १,००,००,०००/– जमा असल्यास ती न्यायालयाच्या परवानगीशिवाय इतर कोणालाही पुढील आदेशापर्यंत देऊ नये.

३. फेडरल बँक यांनी आदेशाचे पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध कायद्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४. या आदेशाची प्रत फेडरल बँक लि., शाखा बार्शी सुत मिल समोर, सुभाष नगर, बार्शी व ऋणको यांना देण्यात यावे.

CHAVAN VIJAY
Digitally signed by CHAVAN VIJAY
Date: 2026.07.21 17:17:22 +0530

दिनांक – २१/०७/२०२६

( व्ही. एच. चव्हाण )
दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर,
बार्शी.

**<u>CERTIFICATE</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | | |
|---|---|---|---|
| a) | Name of the Stenographer | : | G.L. Sutar , Steno. Grade-2 |
| b) | Court | : | C.J.S.D. and A.C.J.M., Barshi. |
| c) | Date of Judgment/Order | : | 21.07.2026 |
| d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 21.07.2026 |
| e) | Judgment/Order uploaded on | : | 21.07.2026 |